# प्रेसनोट दि.२३/०७/२०१९

## ०१ वर्षापासून खुनाच्या प्रयत्नातील गंभीर गुन्हयातील स-हाईत गुन्हेगार युनिट ०४,गुन्हे शाखा पोलीसांच्या ताब्यात.

दि. २०/०७/२०१९ रोजी गुन्हयातील फिर्यादी यांनी अशी तक्रार दिली होती की, त्यांचे अल्पवयीन मुलास दि. २०/०७/२०१९ रोजी दु. ०२.०० वा चे सुमारास फलटण येथून आरोपी नामे मोनिश ऊर्फ राकेश निंबोरे ता जि सातारा, सुमित विलास गिरी, शेखर बाळू चव्हाण,मनोहर संजय जाधव व इतर यांनी फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून अपहरण करुन अज्ञात स्थळी नेवून मारहाण केली होती. सदर गुन्हयाचा तपास फलटण ग्रामीण पोलीस करीत असताना गुन्हयातील इतर आरोपीस अटक करण्यात आली आहे. परंतू आरोपी शेखर बाळू चव्हाण रा मु वारेवस्ती, खामगाव, ता फलटण जि सातारा हा पोलीसांना तुरी देवून पळाला होता. त्यास अदयाप अटक करण्यात आलेली नव्हती.

युनिट ०४,गुन्हे शाखा,पुणे शहर कडील पोलीस कर्मचारी रमेश चौधर व निलेश शिवतरे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली, वरील गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी शेखर बाळू चव्हाण हा विश्रांतवाडी चौक, पुणे येथे थांबलेला असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. त्याप्रमाणे वरिष्ठांच्या आदेशानुसार युनिट -०४,गुन्हे शाखेकडील पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, पोलीस कर्मचारी रमेश चौधर, निलेश शिवतरे, सचिन ढवळे, विठठल घोरपडे, रमेश राठोड असे असे बातमीच्या ठिकाणी जावून सापळा लावला असता, आम्हास शेखर बाळू चव्हाण हा मिळून आला. त्यास ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेखर बाळू चव्हाण ,वय २४ वर्षे, रा मु वारेवस्ती, खामगाव, ता फलटण जि सातारा असे असल्याचे सांगितले व वरील गुन्हा केला असल्याचे कबुल केल्याने त्यास पुढील कार्यवाही करता फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

वरील आरोपीविरुध्द यापुर्वी फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुरनं. १६९/२०१८ भादवि कलम ३२४,५०४,५०६ व गुरनं. २३२/२०१८ भादवि क ३६३, वाठार पोलीस स्टेशन ५६/२०१५ भादवि क ३९४, ३४१,३४ असे एकुण ०३ गुन्हे दाखल आहे.

सदरची कार्यवाही ही मा. अपर पोलीस आयुक्त, श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंह, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान पोलीस उप निरीक्षक श्री विजय झंजाड, सपोफौ शंकर पाटील, पोलीस कर्मचारी निलेश शिवतरे, रमेश चौधर, सचिन ढवळे, विठठल घोरपडे, रमेश राठोड यांनी केली आहे.

दि. २३/०७/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षक
युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर